# दिनांक 20/04/2025

**1.** पेण पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 04/01/2025 रोजी 10:00 वा च्या सुमारास मौजे सौभाग्यईन हॉटेल पेण येथे ता पेण येथे फिर्यादी रा. सौभाग्यईन हॉटेल पेण ता. पेण यांनी एच.डी.एफ .सी .बॅकेचा चेक कोणालाच ईशु केलेला नसताना देखील आरोपीत रा.सातारा जि. सातारा याने त्या क्रमांकांचा चेक अकॉउन्टट ऑफीस मधुन अपहार करुन त्याच्या स्वत:च्या फायदयासाठी त्या चेक क्रंमांकाचा वापर करुन हॉटेल च्या एच.डी.एफ .सी .बॅके खात्यातुन फिर्यादी यांच्या परवानगीशिवाय 3,00,000/- रुपये परस्पर आरोपीत याने स्वत:च्या बॅक खात्यात घेवुन फिर्यादी यांची फसवणुक केली.

याबाबत पेण पोलीस ठाणे गुरनं. 72/2025, भा.न्या.सं.2023 कलम 316(2),318 (4) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहा फौजदार रविराज ढोबळे हे करीत आहेत.

**2.** खोपोली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 19/04/2025 रोजी 16:00 वा च्या सुमारास मौजे मिळ ठाकुरवाडी गावचे हददीत जुना पुणे मुबंई हायवेवर एक्सप्रेस हायवेचे ब्रिजखाली वळणावर ता.खालापुर येथे आरोपीत चालक रा. रा.हिपर्गा बिदर कर्नाटक याने त्याचे ताब्यातील ट्रक क्र. के.ए.56.2483 हा पुणे बाजुकडुन खोपोली बाजुकडे घेवुन जात असताना मिळ ठाकुरवाडी गावचे हददीत जुना पुणे मुबंई हायवेवर एक्सप्रेस हायवेचे ब्रिजखाली वळणावर आलेवेळी ट्रक हा अतिवेगाने, अविचाराने, हयगयीने, बेदरकारपणे, रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लेक्ष करून धोकादायक रित्या चालवुन रोडचे डाव्या बाजुस असलेल्या संरक्षण भिंतीस ठोकर मारून पलटी करून अपघात करून अपघातात स्वत:चे साध्या दुखापतीस व क्लिनर नामे रधुनाथ प्रभु वय-33 वर्षे रा.हुमनाबाद बिदर कर्नाटक याच्या लहान मोठया गंभीर दुखापती होवुन मरणास तसेच ट्रकचे व त्यामधील बाजरी या मालाचे नुकसानीस कारणीभुत झाला.

याबाबत खोपोली पोलीस ठाणे गुरनं.106/2025, मोटार वाहन अधिनियम, 1988 184, भारतीय न्याय संहिता कायदा 2023 चे कलम 106 (1) 281, 125(A) 125 (B) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह / अमोल धायगुडे हे करीत आहेत.

**3.** अलिबाग पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 17/04/2025 रोजी 13:00 वा च्या सुमारास मौजे आदर्श नगर वरसोली ता.अलिबाग येथे फिर्यादी यांचा मुलगा यास कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावुन फिर्यादी यांचे कायदेशीर रखवालीतुन पळवुन नेले.

याबाबत अलिबाग पोलीस ठाणे गुरनं.70/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 137 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/पाटील हे करीत आहेत.

**4.** महाड (एम.आय.डी.सी.) पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 19/04/2025 रोजी 16:30 वा च्या सुमारास मौजे.देशमुख कांबळे शिंदेकोंड, ता.महाड, येथे महिला फिर्यादी यांचे पहीले पती मयत झाले नंतर त्यांनी साक्षीदार यांचे सोबत दुसरा विवाह केला आहे. फिर्यादी व त्यांचे मयत पती यांनी मिळुन व्हॉगनर कार क्र.एमएच 06 बीई 4350 ही खरेदी केली असुन ती फिर्यादी यांचे ताब्यात आहे. आरोपीत क्र.1 व 2 रा.संतोष नगर नांगलवाडी यांनी फिर्यादी यांचे घरी जावुन व्हॉगनर कार मागितले व ते साक्षिदार यांनी देण्यास नकार दिला असता. आरोपीत क्र 02 हे त्यांचे अंगावर मारणे करीता धावुन गेले. आरोपीत क्र.01 यांनी त्यांना अंगामासावरुन शिवीगाळी आरोपीत यांनी फिर्यादी यांचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले.

याबाबत महाड (एम.आय.डी.सी.) पोलीस ठाणे गुरनं.43/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 74,115[2],352,324[4],3[5] प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/ राजेश गोरेगावकर हे करीत आहेत.

**5.** तळा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 19/04/2025 रोजी 17:00 वा च्या सुमारास मौजे पुसाटीवाडी ब्राम्हणआळी येथील इंदीरा फार्महाउसच्या बाजुला असलेल्या पावसाचे पाणी वाहुन जाण्यासाठी तयार केलेल्या भुमिगत सिमेंट पाईप लाईन व दगडाचे चौकोणी बांधकाम केलेल्या ठिकाणी., तळा, येथे जप्त मुददेमाल 1.5000/- रुपये एक ठासणीची बंदुक तिची एकुण लांबी पाहता 5 फुट 6 इंच तिचे लाकडी मुठीमध्ये बसविलेली लोखंडी नळीची लांबी पाहता 3 फुट 2 इंच ठासणीची बंदूक एकूण 5000/- रुपये किमतीची मौजे ब्राम्हणआळी,पुसाटीवाडी ता.तळा कोणीतरी अज्ञात इसमाने कोणत्यातरी अज्ञात कारणासाठी बेकायदेशीररित्या लपवुन ठेवली आहे.

याबाबत तळा पोलीस ठाणे गुरनं.14/2025शस्त्र अधिनियम, 1959, विनापरवाना अग्नीशस्त्र (कलम 3/25 प्रमाणे) गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई श्री.विजय पाटील हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 19.04.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 313 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 2,75,650/-रुपये इतका दंड आकारला आहे.